Literacy for a Billion

Movie: Majha chakula
Year: 1994

Song: Majha chakula majha sonula
Lyricist: Pravin Davane

माझा छकुला माझा सोनुला
माझा छकुला माझा सोनुला
किती करशी खोड्या भारी
म्हणे खट्याळ दुनिया सारी
किती करशी खोड्या भारी
म्हणे खट्याळ दुनिया सारी
तरी माझाच तू नंदलाला
माझा छकुला माझा सोनुला
माझा छकुला माझा सोनुला

या आईची वेडी माया
घास भरविते तुला चिमुकल्या
या आईची वेडी माया
घास भरविते तुला चिमुकल्या
तुझ्यासारखी आई
या जगी कुणाला नाही
तुझ्याविना गं आई
मला मुळीच करमत नाही
कसा बोलतो गं चिमणा
कसा हासतो देखणा
कसा बोलतो चिमणा
कसा हासतो देखणा

दृष्ट कुणाची ना लागो वासराला
माझा छकुला माझा सोनुला
माझा छकुला माझा सोनुला
नभात आली चंदाराणी
हळूच मिटून घे गोड पापणी
नभात आली चंदाराणी
हळूच मिटून घे गोड पापणी
मला आवडते गं आई
ही तुझी गोड अंगाई
मला झोप लागते तेव्हा
तू स्वप्नी येशी आई
सांगेन मी देवाला
माझे आयुष्य दे याला
सांगेन मी देवाला
माझे आयुष्य दे याला
सौख्य लाभो माझ्या लेकराला
माझा छकुला माझा सोनुला
माझा छकुला माझा सोनुला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*